## बाब क्रमांक : २५०/१

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ०६/०८/२०१३ रोजी झालेल्या २४९ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.**

---------------------

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

माननीय प्रधान सचिव / नगर विकास विभाग, सदस्य / प्रा. यांनी बैठकीच्या प्रारुप कार्यवृत्तांतातील पृष्ठ क्र. ४१ वरील ठराव क्रमांक ६६२४ दिनांक ६/०८/२०१३ मध्ये वाहनचालकंाकरिता म्हाडाच्या सेवाप्रवेश नियमावलीतील परिच्छेद ३ मधील सबक्लॉज ( b ) ( iv ) मधील अनुभवाची अहर्ता शिथील करण्याबाबत परन्तुक दिलेले आहे, त्यानुसार अनुभवाची अर्हता प्राधिकरणाच्या मान्यतेने एक वर्षान कमी करण्याची तरतूद आहे त्याचा उल्लेख करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार

**ठराव क्रमांक : ६६२४ दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वाहनचालक संवर्गातील इतर मागासवर्ग प्रवर्गातील महिला आरक्षाणांतर्गत राखीव असलेल्या एका पदावर गुणवत्ता यादीतील एकमेव महिला उमेदवार श्रीमती ममता पाटील यांना लेखी परिक्षेतील मिळालेले गुण आणि वाहन चालन परिक्षेत मिळालेले गुण या बाबी लक्षात घेऊन अनुभवाची अर्हता १ वर्ष कमी करणेबाबत निवड समितीने केलेल्या शिफारशीस प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.

**त्याऐवजी सुधारित ठराव**

**ठराव क्रमांक : ६६२४ दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वाहनचालक संवर्गातील इतर मागासवर्ग प्रवर्गातील महिला आरक्षाणांतर्गत राखीव असलेल्या

एका पदावर गुणवत्ता यादीतील एकमेव महिला उमेदवार श्रीमती ममता पाटील यांना लेखी परिक्षेतील मिळालेले गुण आणि वाहन चालन परिक्षेत मिळालेले गुण या बाबी लक्षात घेऊन अनुभवाची अर्हता १ वर्ष कमी करणेबाबत निवड समितीने शिफारस केली आहे. वाहनचालकांकरिता सेवाप्रवेश नियमावलीतील परिच्छेद ३ मधील सबक्लॉज ( b ) ( iv ) मधील परन्तूकानुसार वाहनचालक संवर्गातील अनुभवाची अहर्ता एक वर्षाने कमी करण्याची तरतूद आहे. या तरतूदीच्या अनुषंगाने श्रीमती ममता पाटील यांचे प्रकरणी अनुभवाची अर्हता एक वर्षाने कमी करण्याबाबत निवड समितीने केलेल्या शिफरशीस प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.

माननीय प्रधान सचिव / नगर विकास विभाग, सदस्य / प्रा. यांनी बैठकीच्या प्रारुप कार्यवृत्तांतातील बाब क्रमांक २४९/९ बाबत पृष्ठ क्र.९ वरील परिच्छेदात पुढीलप्रमाणे नमूद करण्याबाबत सूचविले. " निविदाकाराने दिलेला दर निविदा रकमेच्या ७.९२ टक्के अधिक असल्याने याबाबत निविदाकाराशी चर्चा करुन ते जर ६.५० टक्के अधिक दराने काम करण्यास तयार आहेत का ? याबाबत विचारणा करावी, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. "

उपरोक्तच्या सुचनेच्या अनुषंगाने पृष्ठ क्र.९ वर परिच्छेद क्र.२ पुढीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येत आहे. ठराव क्रमांक ६६०९, दिनांक ६/०८/२०१३ मध्ये साईट क्र.११४, नविन चंद्रपूर येथील ६२ गाळे अल्प उत्पन्न गट योजनेच्या बांधकामाच्या निविदा रक्कम रु.३,१४,१७,८२८/- वर ७.९२ टक्के अधिक म्हणजेच रु. ३,३९,०६,११९.९८ या रकमेचा उल्लेख करण्याच्या सूचना दिल्या.

**ठराव क्रमांक : ६६०९** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, निम्नतम निविदाकार मे. ईगल इंफ्रा इंडिया लि. यांचेकडे साईट क्र.११४ नविन चंद्रपूर येथील ६२ गाळे अल्प उत्पन्न गट योजनेचे काम ६.५०% अधिक दराने करण्यास तयार आहे काय, याबाबत विचारणा करावी व मे. ईगल इंफ्रा इंडिया लि. या दराने काम करण्यास तयार असल्यास निविदा स्विकृत करण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांना देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

**च्या ऐवजी सुधारित ठराव**

**ठराव क्रमांक : ६६०९** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, साईट क्र.११४ नविन चंद्रपूर येथील ६२ गाळे अल्प उत्पन्न गट योजनेचे कामाकरिता निम्नतम निविदाकार मे. ईगल इंफ्रा इंडिया लि. यांनी निविदा रक्कम रु.३,१४,१७,८२८/- वर ७.९२ टक्के अधिक म्हणजेच रु. ३,३९,०६,११९.९८ या रकमेचा देकार दिला आहे. साईट क्र.११४ नविन चंद्रपूर येथील ६२ गाळे अल्प उत्पन्न गट योजनेचे काम ६.५०% अधिक दराने करण्यास तयार आहे काय, याबाबत विचारणा करावी व मे. ईगल इंफ्रा इंडिया लि. या दराने काम करण्यास तयार असल्यास निविदा स्विकृत करण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांना देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २५०/२

**विषय :- स.क्र.२००/१, २००/२/२ब भुसावळ जि.जळगाव येथे ४७ मध्यम उत्पन्न गट सदनिकांचे बाधकाम करणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६२५** **दिनांक : ६/०९/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या स.क्र.२००/१, २००/२/२ब भुसावळ, जिल्हा जळगांव येथील ३.१० हेक्टर क्षेत्रापैकी ०.६२७१ हेक्टर क्षेत्रावर मध्यम उत्पन्न गटांतर्गत ४७ सदनिकांच्या रु. ३,५६,१५,३५९/- च्या किंमतीच्या ई-निविदेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या मे.वर्धमान पी.भंडारी कन्स्ट्रक्शन, जळगांव यांच्या सर्वात कमी दराच्या म्हणजेच १०.०१ टक्के कमी दराच्या देकार रक्कम रु. ३,२०,५०,२६२/- ( रु. तीन कोटी वीस लाख पन्नास हजार दोनशे बासष्ठ फक्त ) या निविदेस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २५०/३

**विषय :- साईट क्र.११४, नविन चंद्रपूर येथील १०६ गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेच्या बांधकामाच्या प्राप्त झालेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६२६** **दिनांक : ६/०९/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या साईट क्र. ११४, नविन चंद्रपूर येथील १०६ गाळे मध्यम उत्पन्न गटाच्या निविदा रक्कम रु. ९,४३,२२,१८७ /- च्या किंमतीच्या ई-निविदेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या मे.एन.एस.कन्स्ट्रक्शन, नागपूर यांच्या सर्वात कमी दराच्या म्हणजेच ४.०७ टक्के कमी दराच्या म्हणजेच रु. ९,०४,८३,२७४/- ( रु. नऊ कोटी चार लाख त्र्याऐंशी हजार दोनशे चौ-याहत्तर फक्त ) या प्रथम निम्नतम निविदेस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २५०/४

**विषय :- मौजे मलकापूर गोरक्षण जि.अकोला येथे १४ दुकाने व १२ कार्यालय गृहनिर्माण योजनेच्या बांधकामाची निविदा स्वीकृतीबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६६२७** **दिनांक : ६/०९/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मौजे मलकापूर गोरक्षण जिल्हा अकोला येथे स.क्र.२४/२ या खाजगी जमिनीवर १४ दुकाने व १२ कार्यालय व भाजी मार्केट तळमजल्याचे ३२४.९२ चौ.मी. आणि १ ते ३ मजले १७११.०५ चौ.मी.प्रस्तावित बांधकामाच्या निविदा रक्कम रु. ३,८०,८०,४९६/- रक्कमेच्या निविदा किंमतीपेक्षा एन.के.बिल्डर्स, अकोला यांच्या १.५१ अधिक दराची म्हणजेच निविदा रक्कम रु. ३,८६,५५,५११/- ( रु. तीन कोटी शाऐंशी लाख पंचावन्न हजार पाचशे अकरा फक्त ) या रक्कमेच्या निविदेस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २५०/६

**विषय :- स.क्र.४३, मौजे डवलामेटी, नागपूर येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत ३० सदनिकांचे बांधकामाच्या प्राप्त झालेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६६२८** **दिनांक : ६/०९/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या स.क्र.४३, मौजे डवलामेटी, नागपूर येथील ३० गाळे उच्च उत्पन्न गटांतर्गत प्राप्त झालेली निविदा किंमत रु. ३,९८,३६,८००/- या रक्कमेवर २.८० टक्के कमी दराची म्हणजेच रु. ३,८७,२१,३६९.६० ( रु. तीन कोटी सत्त्याऐंशी लाख एकवीस हजार तीनशे एकोणसत्तर व साठ पैसे फक्त ) या रकमेच्या मे.विघ्नहर्ता कन्स्ट्रक्शन यांच्या निविदा स्विकृतीस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २५०/१७

**विषय :- कनिष्ठ लिपिक-टंकलेखक (वर्ग-३) या पदाकरीताच्या सेवा प्रवेश नियमामध्ये माजी सैनिकांना टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र सादर करणेकरीता नियुक्तीनंतर सहा महीन्यांच्या अवधी देण्याबाबतच्या तरतूदीचा समावेश करणेबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६६२९** **दिनांक : ६/०९/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, सामान्य प्रशासन विभागाने प्रसिध्द केलेल्या लिपीक-टंकलेखक (बृहन्मुबई बाहेरील) शासकीय कार्यालयासाठी सेवा प्रवेश नियम १९९३ महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक ७ ऑक्टोबर १९९३ नुसार प्रसिध्द झालेल्या या सेवा प्रवेश नियमातील तरतुदींमध्ये परंतूक (Proviso) समाविष्ट असून सदर परंतूकानुसार नियुक्तीच्यावेळी माजी सैनिक उमेदवाराकडे टंकलेखनाचे प्रमाणपत्र नसल्यास सदर प्रमाणपत्र नियुक्तीपासून ११ महिन्याचे आत सादर करण्याकरीता सूट देण्यात आली आहे. सदर तरतूद विचारात घेवून प्राधिकरणाच्या कनिष्ठ लिपिक टंकलेखक या संवर्गाच्या सध्याच्या प्राप्त सेवा नियमामध्ये कलम ३ (b) मध्ये खालीलप्रमाणे परंतूकाचा ( Proviso ) समावेश करण्यास व सदर तरतूद सद्यस्थितीत सन २०१३ मध्ये होत असलेल्या भरती प्रक्रीयेतील कनिष्ठ लिपीक-टंकलेखक संवर्गातील माजी सैनिक प्रवर्गातील आरक्षाणांतर्गत लागू करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.

## बाब क्रमांक : २५०/२०

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २०११-१२ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा, लेखापरीक्षण अहवालासह प्राधिकरणाच्या बैठकीत अवलोकनार्थ ठेवण्याबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६६३०** **दिनांक : ६/०९/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाचा सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा लेखापरिक्षण अहवाल स्विकृत करुन व त्याचे मराठीकरण करुन इंग्रजी व मराठी भाषेतील छापील प्रतीसह वार्षिक लेखा इंग्रजी २५० व मराठी ७०० प्रतीत ( CD सह ) विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे सादर करण्याकरिता शासनाकडे पाठविण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

# Item no. : 250/21

-----------------------------------

**Sub : Form No 10 and Resolution to be submitted to the Income Tax Dept.**

## Resolution No.-6631 Date – 06/09/2013.

Resolved that the entire revenue surplus of MHADA for the assessment year 2013-14 corresponding to Financial Year 2012-13 shall be utilized/applied on the objects of MHADA during the next five consecutive financial years beginning from 1$^{st}$ April, 2013 and particularly on the schemes as mentioned in the budget for financial year 2013-14 as required u/s 11 of the Income Tax Act.

Action on this resolution to be presented before the Authority in the next meeting.

## बाब क्रमांक : २५०/२२

**विषय :- मुंबई मंडळाच्या सोडतीसाठी उत्पन्न गटाच्या मर्यादेत सुधारणा करण्याबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६६३२** **दिनांक : ६/०९/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सर्व मंडळांतर्गत बांधण्यात येणा-या सदनिकांची वितरणासाठी सध्या असलेल्या उत्पन्न गटांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ ही अर्जदारांच्या उत्पन्नात होणारी वाढ व सदनिकांच्या किंमतीत होणारी वाढ विचारात घेऊन पुढीलप्रामणे सुधारित करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

| अ.क्र. | उत्पन्न गट | सध्याची उत्पन्न मर्यादा | सुधारित उत्पन्न मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | अत्यल्प उत्पन्न गट | रु. ८०००/- पर्यंत | रु. १६०००/- पर्यंत |
| २. | अल्प उत्पन्नगट | रु. ८००१/- ते २००००/- पर्यंत | रु. १६००१/- ते ३१०००/- पर्यंत |
| ३. | मध्यम उत्पन्न गट | रु. २०००१/- ते ४००००/- पर्यंत | रु. ३१००१/- ते ६२०००/- पर्यंत |
| ४. | उच्च उत्पन्न गट | रु. ४०००१/- पेक्षा जास्त | रु. ६२००१/- पेक्षा जास्त |